'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 159 – Dr. Babasaheb Ambedkar : Versatile Personality
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार

**प्रा. संदीप पुंडलिक नन्नावरे**
महात्मा फुले महाविद्यालय ,पिंपरी पुणे-१७

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाला सतत शिकण्याची हाकाटी दिली. कारण शिक्षणामुळेच आपल्या जगण्यात आमूलाग्र बदल होऊ शकतो, हे त्यांनी जाणलं होतं. बाबासाहेबांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन किती प्रगल्भ आणि आधुनिक होता.शिक्षण म्हणजे प्राप्त ज्ञानानुसार व्यक्तीमत्वात अपेक्षित परिवर्तन घडवून आणणाऱ्या क्रीयाप्रक्रियांची गोळाबेरीज ही अखंड प्रक्रिया आहे.या प्रक्रियेत शिकणारा व शिक्षण प्रक्रियेतील विषयवस्तू किंवा ज्यामुळे क्रिया प्रतिक्रिया होऊन माहिती प्राप्त होते ते ज्ञान सजीव प्राण्यात घडून येणारे परिवर्तन हा शिक्षणाचा परिणाम होय. शिक्षण ही देवाण घेवाण करण्यापुरती प्रक्रिया नसून टी अतिशय गुंतागुंतीने परिपूर्ण आहे.व तिचा संबंध मनुष्याच्या थेट अस्तित्वाशी आहे.शिक्षण हे परिवर्तनाचे दुसरे नाव आहे.शिक्षणाने व्यक्ती समाज व परिसर यात अपेक्षित परिवर्तन घडवून आणणे हेच शिक्षणाचे साध्य होय असे मानले जाते. १ शिक्षण हे समाज परिवर्तनाचे हत्यार आहे. त्याचा योग्य उपयोग झाला पाहिजे, असे डॉ. आंबेडकर यांना वाटत असे. जो समाज अशिक्षित असतो तो शिक्षणाअभावी सर्वस्व गमावलेला असतो. शिक्षणाने माणसात कर्तव्य आणि हक्काची जाणीव निर्माण होते. स्त्रियांना उत्तम शिक्षण दिले तर त्या मुलांवर बालवयातच चांगले संस्कार लादू शकतात व देशाचे उत्तम,जागरुक नागरिक घडवायला महत्वाचा वाटा उचलू शकतात. प्राथमिक शिक्षणाचे ध्येय असे असले पाहिजे की, पालकांनी मुलगा किंवा मुलीला शाळेत प्रवेश दिला म्हणजे. त्याचे किंवा तिचे शिक्षण लिहिता वाचण्याच्या अवस्थेपर्यंत राहू नये तर संपूर्णपणे उच्च शिक्षण घेऊन सुशिक्षित होऊनच मुले बाहेर पडावी व पुढील आयुष्यातही ज्ञान अवगत करीत रहावे. डॉ.आंबेडकरांनी शिक्षणाचे महत्व त्याची अपरिहार्यता ओळखली होती. म्हणूनच त्यांनी आपल्या अनुयायांना सर्वप्रथम शिक्षण घेण्याचा संदेश दिला.

"शिलाशिवाय विद्या फुकाची आहे.कारण विद्या एक शस्त्र आहे.एकद्याजवळ विद्येचे शास्त्र असेल व तो शालीवान नसेल तर विद्येच्या शास्त्राने तो दुसऱ्याचा घात करील'. पुढे ते असे म्हणतात 'विद्या ही तलवारी सारखी आहे.परंतु तिचे महत्व तिला धारण करणाऱ्यावर अवलबून राहील अडाणी माणूस कोणास फसवू शकत नाही.फसवायचे कसे हे त्याला उमगत नाही.परंतु शिकलेल्या सावरलेल्या लोकांच्या ठिकाणी कोणास कसे फसवावे व त्य त्या फसविण्यासाठी लागणारा व्युक्तिवाद करावा हे माहीत असल्याने खऱ्याचे खोटे व खोट्याचे खरे ते भासवू शकतात शीला शिवाय जर शिकले सवरले लोक निपजू लागले तर त्यांच्या शिक्षणातच समाजाचा व राष्ट्रांचा नाश आहे." २ अस्पृश्य समाजाची परंपरागत सामाजिक व धार्मिक गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी त्यांना जागृत करणे आवश्यक वाटत होते.विविध चळवळीमधून या समाजाचा खचलेला आत्मविश्वास वाढेल तसेच हा समाज शिक्षणाने पुढे आल्याने त्यांचा परिपूर्ण विकास होईल असे डॉ. आंबेडकरांना वाटत होते.त्यामुळेच त्यांनी सुरुवातीच्या काळात या समाजात शिक्षणाचा प्रचार मोठ्या प्रमाणात घडवून आणला.मिळालेल्या संधीचा योग्य वापर केल्यास दलित उच्यविद्या विभूषित होऊ शकते हे तत्व आपल्या उदाहरणाने समाजासमोर मांडले. इ.स. १९२८ मध्ये दलितवर्ग शिक्षण संस्थेची ( Depressed Classes Education Society ) स्थापना केली. यामधून दलितांच्या मुलांना वसतिगृह पुरवण्यासाठी मुंबई शासनाला आवाहन केले शासनाने या योजनेला संमती दिली.या शिक्षण संस्थेचे विश्वस्त मंडळ त्यांचा कारभार पाहत होते.डॉ. आंबेडकर स्वत:त्याचे कार्यवाह होते.९००० वार्षिक अनुदानाची गुंतवणूक करणाऱ्या नव्या पाच वसतीगृहांचे व्यवस्थापन त्यांनी या संस्थेवर सोपविले.३



MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI PUNE-17